ॲड. संभाजी गणेशराव चुनखडे
जिल्हाध्यक्ष-शिवसेना लिगल सेल
कार्यालय :- भाग्यनगर, जुना जालना ता.
जि. जालना-431203 महाराष्ट्र
मो. 7020471498

ॲड. अभिषेक एम. सतकर
जिल्हाउपाध्यक्ष-शिवसेना लिगल सेल
कार्यालय :- भाग्यनगर, जुना जालना
ता. जि. जालना-431203 महाराष्ट्र
मो. 9545139353

दि. 11.12.2024

प्रति,

**मा. जिल्हाधिकारी साहेब,**

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**विषय :- बांगलादेशमधील अल्पसंख्यांक पिडीत समाजाची बाजु मांडणाऱ्या वकीलां विरुध्द होणारे हल्ले तात्काळ थांबवुन त्यांना संरक्षण देणे बाबत.**

**आ. महोदय,**

वरील विषयी आपणास नम्र निवेदन करण्यात येते की, शिवसेना हा पक्ष हिंदु ह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 20% राजकारण व 80% समाजकारण या विचाराने निर्माण केलेला असुन त्या अंतर्गत आमची वकीलांची संघटना आहे. जी राष्ट्र आणि समाजाला समोर ठेवुन काम करते. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत न्याय पोहोचला पाहिजे या तत्वावर देशभरात कार्य करते. सर्वांना मानवी हक्क प्रदान करणे हे आमच्या संघटनेच्या मुळ उद्देशापैकी एक आहे. बांगलादेशात हिंदुवर होत असलेल्या अत्याचारामुळे आमचा पक्ष व त्या अंतर्गत चालणारी आमची संघटना सदर घटनेमुळे अत्यंत व्यथीत झालेली आहे.

आम्ही तुमच्या माध्यमातुन केंद्र सरकार, बांगलादेश सरकार आणि आंतरराष्ट्रीय मानवअधिकार सुमदायाला विनंती करतो की, त्यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष द्यावे आणि बांगलादेश सरकारला कडक संदेश द्यावा.

आमच्या विनंतीपुर्वक मागण्या :-

1. **भारत सरकार** :- हिंदुच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी आणि त्यांना त्यांचा धर्म आणि संस्कृती पाळण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी बांगलादेश सरकारवर दबाव आणावा.
2. **बांगलादेश सरकार** :- हिंदुवरील अत्याचार त्वरीत थांबवाचा आणि दोषींवर कठोर कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

3. **आंतरराष्ट्रीय समुदाय** :- या समस्येकडे लक्ष द्यावे आणि बांगलादेशातील मानवाधिकार परिस्थीती सुधारण्यासाठी पावले उचलावे.

4. **वकीलांना संरक्षण** :- बांगलादेशमधील अल्पसंख्यांक पिडीत समाजाची बाजु मांडणाऱ्या वकीलां विरुध्द होणारे हल्ले तात्काळ थांबवुन त्यांना संरक्षण देण्यात यावे.

आम्ही आशा करतो की, तुमच्या माध्यमातुन केंद्र सरकार, बांगलादेश सरकार आणि आंतरराष्ट्रीय समुदारय आमच्या विनंतीचा गांभीर्याने विचार करतील आणि बांगलादेशातील हिंदुच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलतील.

**निवेदक**

**ॲड. संभाजी गणेशराव चुनखडे** **ॲड. अभिषेक एम. सतकर**

Adv. Haridas lande